जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 OCT 2026 तरुण भारत

पदवीबरोबरच संवाद कौशल्ये आत्मसात करा

- कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांचे प्रतिपादन

| त. भा. प्रतिनिधी

गडहिंग्लज : नवी युवा पिढी सहकार्य, समीक्षात्मक चिंतन तसेच नवनिर्मिती या त्रिसूत्रीतून पुढे जाताना दिसत आहे. अपयशाने खचून न जाता यशाकडे वाटचाल करण्याची धमक त्यांच्यात आहे. कौशल्य विकासाच्या काळात पदवी महत्त्वाची असली तरी त्याबरोबरच संवादकौशल्ये आत्मसात करावीत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी केले.

येथील पाळी महाविद्यालयातील विद्यार्थी विकास कक्षाच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सत्कारप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष अरविंद किल्लेदार होते. स्वागत प्राचार्य डॉ. दत्ता पाटील यांनी केले. यावेळी कुलगुरू डॉ. कामत यांनी संस्थेने



गडहिंग्लज : विद्यार्थ्यांचा सत्कार प्रसंगी कुलगुरू डॉ. रजनीश कामत, शेजारी अरविंद किल्लेदार, डॉ. दत्ता पाटील इतर मान्यवर.

राजकारणापासून अलिप्त राहून केवळ शैक्षणिक क्षेत्रात गुणवत्तापूर्ण वाटचाल करीत आपला स्वतंत्र ठसा उमटविला आहे असे गौरवोद्गार काढले. दरम्यान रत्नमाला पाळी कौशल्य विकास केंद्राच्या वतीने निर्माण केलेल्या विविध वस्तूंच्या विक्री केंद्राचे उद्घाटन डॉ. कामत यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयातील पीएच.डी. प्राप्त विद्यार्थी, सेट-नेट, पेटंट मिळवणारे प्राध्यापक, विद्यार्थी आणि गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी, विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान मान्यवराच्या हस्ते करण्यात आला. डॉ. नागनाथ मासाळ यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी सहसचिव गजेंद्र बंदी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. नीलेश शेळके, डॉ. सरोज बिडकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सचिन जानवेकर यांनी आभार मानले. यावेळी सचिव ॲड. बी. जी. भोसकी, संचालक डॉ. शिवकुमार कोल्हापुरे, मुख्याध्यापक उमेश सावंत यांच्यासह गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2026

पुढारी

विद्यापीठाकडून उन्हाळी सत्रातील परीक्षांचे १०० टक्के निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे आजअखेर १०० टक्के निकाल जाहीर झाले आहेत. दि. १३ रोजी बीएस्सी., बीएड., एमएस्सी. ऑनलाईन या दोन अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर सर्व ९०१ अभ्यासक्रमांचे शंभर टक्के निकाल करण्यात आले आहेत. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

14 OCT 2026
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

विद्यापीठ अंतर्गत ८९१ विषयांचा निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. बीएससी बीएड सेमिस्टर तीन आणि एमएस्सी मॅथस ऑनलाईन सेमेस्टर चारच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. आजअखेर सर्व ८९१ अभ्यासक्रमांचे शंभर टक्के निकाल जाहीर झाले आहेत. पथकाकडून कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली नाही. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचना प्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

14 OCT 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

एक होती कमला!



ज्ञान-विज्ञान
डॉ. व्ही.एन. शिंदे
संपर्क : ९६७३७८४४००

एखाद्या व्यक्तीचे संपूर्ण आयुष्यच जणू लढण्यासाठी असते. ती व्यक्ती समस्यांशी लढते, यशस्वी होते, समाज त्यांची दखल घेतो, त्या व्यक्तीच्या सन्मानाचा सोहळा आयोजित केला असताना, सत्कार स्वीकारतानाच त्या व्यक्तीचे निधन व्हावे हे निश्चितच चटका लावणारे असते. उच्च शिक्षणासाठीच्या प्रवेशापासून ग्राहकांच्या हितापर्यंत लढणारी, यशस्वी होणारी, समाजाला खूप काही देणारी ज्ञानाची पुजारी असणारी व्यक्ती म्हणजे कमला सोहोनी.

कमलांचा जन्म नारायणराव भागवत यांच्यापोटी १९१२ मध्ये झाला. घराणे उच्च विद्याविभूषित. कुटुंबाचा पाठिंबा हीच कमलांच्यासाठी सकारात्मक बाजू होती. कमलाना विज्ञानाची आवड होती, त्यांना संशोधक व्हावेसे वाटे. त्यांनी पहिलीपासून पदवीपर्यंतचे शिक्षण अव्वल क्रमांकाने पूर्ण केले. मुंबई विद्यापीठातून त्यांनी भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र विषय घेऊन बी.एस्सी. अभ्यासक्रम पूर्ण केला. मुंबई विद्यापीठात त्या प्रथम आल्या. उद्योजक टाटांच्या पुढाकारातून स्थापन झालेली इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगलोर येथील संस्था विज्ञान शिक्षणासाठी सर्वोत्तम मानली जात असे. आजही ती आहे.

भारताचे विज्ञानातील नोबेल पुरस्कार विजेते संशोधक सर सी. व्ही. रमण त्यावेळी या संस्थेचे संचालक होते. भारतातील सर्व विद्यापीठांत प्रथम आलेल्या मुलांना तेथे प्रवेश मिळत असे. कमला यांचाही प्रवेश निश्चित होता. कमला यांनी रितसर अर्ज केला, मात्र संस्थेकडून 'तुम्ही मुलगी असल्याने, प्रवेश देता येणार नाही', असे पत्राद्वारे कळवण्यात आले.

त्या काळात जगभरातील अनेक देशांत महिलांच्या शिक्षणवर निर्बंध होते. भारतात तर खूपच बिकट स्थिती होती. कमला यांना हा अन्याय सहन होणारा नव्हता. त्यांनी वडिलांना घेऊन थेट बेंगलोर गाठले. अस्वस्थ कमला सरळ संचालक रमण यांना भेटायला गेल्या. त्यांना पुन्हा पत्रातील वाक्येच ऐकवण्यात आली.

आपले ऐकण्यास संचालक रमण तयार नाहीत, हे पाहिल्यानंतर कमला यांनी गांधीजींचे सत्याग्रहाचे हत्यार उपसले. त्या संचालकांच्या कक्षाबाहेर उपोषणास बसल्या. त्यानंतर मात्र रमण यांनी पाऊल मागे घेतले. प्रशासनाने प्रवेश देण्यास होकार दिला. मात्र, आज ज्या अटी मानवी हक्काच्या विरुद्ध मानल्या जातील अशा तीन अटी घातल्या. त्यातील पहिली अट म्हणजे त्यांचा प्रवेश हा नियमित नसून एक वर्षाच्या परीविक्षाधिन कालावधी असेल, ज्यामध्ये त्यांच्या वर्तणुकीची पाहणी करून त्यांचा प्रवेश कायम करायचा की नाही हे ठरवले जाईल. दुसरी अट, मार्गदर्शकांच्या सूचनेनुसार त्यांना रात्री उशिरापर्यंत प्रयोगशाळेत काम करावे लागेल. तिसरी अट म्हणजे, त्यांच्यामुळे पुरुष शिक्षक आणि मुलांतील वातावरण बिघडणार नाही याची दक्षता त्यांनी घ्यावी. यातील कोणतीही अट मोडेल, त्याक्षणी त्यांचा प्रवेश रद्द केला जाणार होता.

त्यांनी एकाग्रतेने अभ्यासक्रम पूर्ण करण्यास सुरुवात केली. एम.एस्सी. पदवी प्राप्त होताच त्यांनी मुंबईच्या हाफकिन्स इन्स्टिट्यूटमध्ये पीएच.डी. पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. मुंबई विद्यापीठाने स्प्रिंगर रिसर्च फेलोशिप आणि सर मंगलदास नथुबाई फॉरेन स्कॉलरशिप प्रदान केल्या. १९३७ मध्ये त्या केंब्रिज विद्यापीठात गेल्या. तेथे त्यांनी डेरिक हिचर आणि रॉबीन हिल यांच्यासमवेत संशोधन केले.

लक्झेंबर्गवरून परतताच त्यांनी आपला मोर्चा पुन्हा संशोधनाकडे वळवला. कडधान्ये, डाळी आणि दुधातील प्रथिनांवर संशोधन केले. अन्य कंदवर्गीय वनस्पतींवरही संशोधन केले. तेथे त्यांनी वनस्पती ज्या घटकामुळे श्वसन करतात, तो घटक शोधला. याच विषयावरील अवघ्या चाळीस पानांच्या प्रबंधावर त्यांना केंब्रिज विद्यापीठाने पीएच. डी. पदवी प्रदान केली.

इंग्लंड आणि अमेरिकेत अनेक संधी असतानाही आपल्या संशोधनाचा फायदा देशाला व्हावा, म्हणून त्या भारतात परतल्या. त्यांना दिल्लीच्या लेडी हार्डिंग वैद्यक महाविद्यालयात नियुक्ती दिली. तेथे त्यांनी रक्तातील कोलेस्ट्रॉलवर संशोधन केले. पुढे कुन्नुर येथील संस्थेत आहारशास्त्रावरील संशोधनासाठी त्यांना नियुक्त करण्यात आले. तेथे बहुतांश संशोधक पुरुष होते. त्यांच्या पुरुषी अहंकाराचा त्यांना खूपच त्रास झाला. तरीही त्यांनी आरोग्यासाठी जीवनसत्त्व 'ब' आणि 'क'चे महत्त्व शोधून काढले.

त्यांची नजर तीक्ष्ण होती. एकदा कोल्हापूरला आल्या असताना, पहिलवान भिजवलेले हरभरे आणि गूळ खाताना त्यांनी पाहिले. परतताच त्यांनी यावर संशोधन सुरू केले. हरभऱ्यातून रक्तस्राव कमी करणारे घटक शरीरात मिळत असल्याचे शोधले. दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडतर्फे लढणाऱ्या सैनिकांना दिल्या जाणाऱ्या आहारात हरभऱ्याचा समावेश करण्यात आला. त्यांनी आहारशास्त्रावरील संशोधनात कोणते घटक कोणत्या कारणासाठी आणि का उपयुक्त आहेत हे शोधले. त्याचवेळी माधवराव सोहोनी या संख्याशास्त्रज्ञाने त्यांच्याशी विवाहाचा प्रस्ताव ठेवला. कमलांनी संशोधन पुढे सुरू ठेवण्याच्या अटीवर त्यांचा प्रस्ताव स्वीकारला. त्यांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या विनंतीनुसार बडोदा येथे जीव-रसायनशास्त्र प्रयोगशाळा सुरू करून दिली.

विज्ञान संस्थेत जीवरसायनशास्त्र विभागामध्ये नियुक्त करण्यात आले. तत्कालिन राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी विज्ञान संस्थेस भेट दिली, तेव्हा त्यांनी नीरा पेयावर संशोधन करण्यास सूचवले. त्यांनी नीरामध्ये असणारे उपयुक्त घटक शोधले. या संस्थेच्या संचालकपदी नियुक्ती करताना पुन्हा महिला म्हणून त्यांना अनेक वर्षे डावलण्यात आले. पुढे त्यांनी ग्राहक हित विषयावर जागरूकता आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी ग्राहक कायद्याचा मसुदा तयार केला. त्यांच्या एकूण कार्याचा सन्मान म्हणून भारतीय वैद्यक संस्थेने त्यांचा मोठा सत्कार आयोजित केला. हा सत्कार स्वीकारताना २८ जून १९९७ रोजी त्यांचे निधन झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2026
सकाळ

गुणीदास फाउंडेशनतर्फे विशेष मैफल



कोल्हापूर : गुणीदास फाउंडेशनच्या मैफलीत गायन करताना मेहेर परळीकर.

कोल्हापूर : येथील गुणीदास फाउंडेशनतर्फे पातियाळा घराण्याचे युवा शास्त्रीय गायक मेहेर परळीकर यांची विशेष मैफल रंगली. शिवाजी विद्यापीठाचे संगीत विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई, पं. विनोद डिग्रजकर, पं. सुधीर पोटे, गुणीदास फाउंडेशनचे उपाध्यक्ष दिलीप बनछोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत मैफल झाली. परळीकर यांनी 'पुरिया कल्याण' रागामधील 'होवन लगी सांज' हा विलंबित एकतालातील ख्याल सादर केला. त्यानंतर द्रुत त्रितालात 'मोरी सुनले जो करतार' ही बंदिश सादर केली. बागेश्री रागातील 'दितोम तनन तनदेरेना' हा झपतालातील तराणा सादर केला. तबला वादक आशय कुलकर्णी आणि युवा संवादिनी वादक स्वरूप दिवाण यांची साथसंगत होती. गौरी केसकर यांनी सूत्रसंचालन केले. फाउंडेशनचे संचालक अमित कुलकर्णी, प्रणव मोघे, अक्षय शुक्ल, डॉ. अजित शुक्ल, दर्शन शिपूरकर, अरविंद लाटकर, सुधर्म जामसांडेकर, प्रदीप कुलकर्णी आदी उपस्थित होते.